# बृहन्मुंबई महानगरपालिका

# ॥गणेशोत्सव॥



## श्रीगणेश गौरव पुरस्कार २०२४

॥ प्रवेश अर्ज ॥

# बृहन्मुंबई महानगरपालिका

# श्रीगणेश गौरव पुरस्कार २०२४

**श्रीगणेश गौरव पुरस्कार स्पर्धा :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विद्यमाने जनसंपर्क विभागातर्फे दरवर्षी श्रीगणेश गौरव स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा स्पर्धेचे ३५वे वर्ष आहे. श्रीगणेशमूर्तीची सुबकता, तिच्या सभोवतालची आरास, त्यासाठी निवडलेल्या विषयाचा आशय, त्याची मांडणी, मंडळाने केलेली सामाजिक विधायक कार्ये, परिसर स्वच्छता, सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळाने उत्सवाच्या काळात महानगरपालिकेच्या स्वच्छता मोहिमेला दिलेला प्रतिसाद, स्वच्छता, पर्यावरण आदी जनहिताचे संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी केलेली विशेष कार्ये इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातात. निवड समितीने शिफारस केलेल्या विजेत्या मंडळांना खालीलप्रमाणे पुरस्कार देण्यात येतात.

**क)** **१)** प्रथम पुरस्कार रु.७५,०००/- **२)** द्वितीय पुरस्कार रु.५०,०००/- **३)** तृतीय पुरस्कार रु. ३५,०००/-
**ख)** वैयक्तिक पुरस्कार **१)** सर्वोत्कृष्ट मूर्तिकार रु. २५,०००/- **२)** सर्वोत्कृष्ट सजावटकार रु. २०,०००/-
**ग)** दोन उत्तेजनार्थ पुरस्कार : प्रत्येकी रु.१०,०००/-) **घ)** शाडू मातीची सर्वोत्कृष्ट मूर्ती पुरस्कार रु.२५,०००/-
**च)** सामाजिक कार्य / समाज कार्य / अवयवदान जागृती : पुरस्कार रु.१५,०००/-
**छ)** प्लास्टिक बंदी / थर्माकोल बंदी / पर्यावरण विषयक जनजागृती उत्तेजनार्थ दोन पुरस्कार : प्रत्येकी रु.१०,०००/-

कृपया स्पर्धेचा प्रवेश अर्ज पुढील पत्त्यावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर करावा :-
जनसंपर्क विभाग, तळ मजला, नवी इमारत, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

**अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख :- ०६ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत.**

**स्पर्धेचे नियम :-**

१. ज्या श्रीगणेशोत्सव मंडळांची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे आहे, त्यांनाच या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. नोंदणीकृत श्रीगणेशोत्सव मंडळांनी यापूर्वी किमान पाच वर्षे गणेशोत्सव साजरा केलेला असावा.
३. ज्यांच्याकडे महानगरपालिका, वीज वितरण कंपन्या, पोलीस खाते यांचे उत्सव साजरा करण्यासाठी आवश्यक असलेले परवाने आहेत, अशी मंडळेच या स्पर्धेत भाग घेऊ शकतील.

या स्पर्धेसाठी नियुक्त केलेल्या तज्ज्ञांची निवड समिती, स्पर्धेत भाग घेण्यास पात्र असणाऱ्या सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांना पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार भेट देऊन अंतिम फेरीनंतर स्पर्धेचा निकाल बंद लिफाफ्यात महानगरपालिका प्रशासनाला सादर करतील. दरवर्षी श्रीगणेशोत्सव सुरळीतपणे पार पाडण्यासाठी वर नमूद केलेल्या सूचनांचे पालन बृहन्मुंबईतील श्रीगणेशोत्सव मंडळांनी व जनतेने योग्य प्रकारे करावे, ही नम्र विनंती.

**समन्वयक :-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे श्री. प्रशांत सपकाळे, उप आयुक्त (परिमंडळ - २) यांची श्रीगणेशोत्सवासाठी समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे :-

उप आयुक्त (परिमंडळ - २) यांचे कार्यालय, 'एफ दक्षिण' विभाग कार्यालय इमारत, ३ रा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई - ४०० ०१२. दूरध्वनी : ०२२-२४१३ ४५६०.



'श्रीगणेश गौरव पुरस्कार २०२३' मध्ये
शाडू मातीची सर्वोत्कृष्ट ठरलेली श्रीगणेशमूर्ती

# बृहन्मुंबई महानगरपालिका

# श्रीगणेश गौरव पुरस्कार २०२४

## प्रवेश अर्ज

जनसंपर्क विभाग, तळ मजला, विस्तारित इमारत,
महानगरपालिका मुख्यालय, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१,
दूरध्वनी : ०२२-२२६२०२५१ (विस्तारित क्र.- ४८६५)

**(अर्ज शुक्रवार, दि. ०६/०९/२०२४ रोजी सायं. ४ वाजेपर्यंत संपूर्ण माहितीसह जनसंपर्क कार्यालयात सादर करावा)**

१) श्रीगणेशोत्सव मंडळाचे नाव व पूर्ण पत्ता : ( उत्सव स्थळाजवळील ठळक खूण / प्रसिद्ध ठिकाण लिहावे.)

________________________________

________________________________

२) श्रीगणेशोत्सव मंडळाचा ई-मेल आयडी :

३) श्रीगणेशोत्सव मंडळ स्थापना वर्ष :

४) धर्मादाय आयुक्तांकडील न्यास नोंदणी क्रमांक :

५) मंडळाच्या दोन जबाबदार पदाधिकाऱ्यांची नावे, हुद्दा, पत्रव्यवहारासाठी पत्ता व संपर्क क्रमांक :

| क) ____________________ | ख) ____________________ |
| --- | --- |
| ____________________ | ____________________ |
| ____________________ | ____________________ |
| ई-मेल आयडी ____________ | ई-मेल आयडी ____________ |
| भ्रमणध्वनी क्र. ____________ | भ्रमणध्वनी क्र. ____________ |

६) पुरस्कार घोषित झाल्यास धनादेश कोणाच्या नावे काढावा ?

________________________________

७) मूर्तीकाराचे नाव - पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक ( हा रकाना पूर्ण भरावा )

________________________________

________________________________

८) नेपथ्यकाराचे नाव - पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक ( हा रकाना पूर्ण भरावा )

________________________________

________________________________

९) मंडळाने गेल्या वर्षभरात केलेली विशेष कार्ये (थोडक्यात लिहिणे) :-

_________________________________________________________________________________________

_________________________________________________________________________________________

_________________________________________________________________________________________

१०) आपल्या मंडळाने यंदा साकारलेल्या देखाव्यातून कोणता विषय मांडला आहे ?

_________________________________________________________________________________________

_________________________________________________________________________________________

११) यंदाच्या उत्सवात आपण समाज प्रबोधनात्मक जनजागृती उपक्रम/ देखावा केला असल्यास संक्षिप्त तपशिल द्यावा.

_________________________________________________________________________________________

_________________________________________________________________________________________

१२) यंदाच्या उत्सवात आपण पर्यावरण रक्षण जनजागृती देखाव्याचा समावेश केला असल्यास संक्षिप्त तपशिल द्यावा.

_________________________________________________________________________________________

_________________________________________________________________________________________

१३) यंदाच्या उत्सवात आपण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नागरी सेवा-सुविधांविषयक जनजागृती/ देखावा केला असल्यास संक्षिप्त तपशिल द्यावा.

_________________________________________________________________________________________

_________________________________________________________________________________________

१४) आपल्या मंडळामार्फत शाडू मातीच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे का ?

_________________________________________________________________________________________

या प्रवेश अर्जात दिलेली माहिती खरी असून स्पर्धेसाठी असलेले बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नियम,
अटी आणि परीक्षक मंडळाचे निर्णय इत्यादी बाबी आम्हास बंधनकारक असतील.

दिनांक : ____________________

श्रीगणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्याची स्वाक्षरी

पूर्ण नाव : ____________________

हुद्दा : ____________________

मंडळाचा शिक्का

( आवश्यक त्या कागदपत्रांच्या मूळ प्रती आणि मंडळाचे गेल्या पाच वर्षांचे अहवाल परीक्षणाच्या दिवशी दाखविण्यास तयार ठेवावेत.)

---

## खालील बाबींच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात :-

- धर्मादाय आयुक्तांचे न्यास नोंदणी/ संबंधित प्रमाणपत्र.
- उत्सवाचे ठिकाण वापरण्यासाठी महानगरपालिकेकडून मिळालेला परवाना.
- वीज वापरासाठी वीज वितरण कंपनीकडून मिळालेला परवाना व त्यासाठी भरलेल्या रक्कमांची पावती.
- उत्सव साजरा करण्यासाठी स्थानिक पोलीस परवानगीची प्रत